अमर शिक्षण प्रसारक संस्था, मंगरूळपीर, जि.वाशिम.

द्वारा संचालित

श्री.वसंतराव नाईक कला व श्री.अमरसिंग नाईक वाणिज्य महाविद्यालय, मंगरूळपीर, जि.वाशिम.



# अमरवाणी

## २०१६-१७

Scanned with OKEN Scanner

अमर शिक्षण प्रसारक संस्था, मंगरुळपीर, जि वाशिम.
द्वारा संचालित
श्री.वसंतराव नाईक कला व श्री.अमरसिंग नाईक वाणिज्य
महाविद्यालय, मंगरुळपीर, जि वाशिम.




# अमरवाणी

## २०१६-१७



Scanned with OKEN Scanner

# महाराष्ट्राचे थोर नेते



## श्री वसंतरावजी नाईक साहेब



Scanned with OKEN Scanner

# आमचे भाग्य विधाता

## संस्थापक




## दानशूर श्री.अमरसिंग हरिचंद नाईक

आसोला खुर्द, ता.मानोरा, जि.वाशिम.



Scanned with OKEN Scanner



मा. श्री. आत्माराम अमरसिंग राठोड



Scanned with OKEN Scanner

# - संपादकीय -

संपादकीय......

यावर्षीचा वार्षिकांकचा अंक हाती देतांना अत्यानंद होत आहे. 'विद्येच्या ज्ञानसागरात संचार करणारा राजहंस' असे विद्यार्थी वर्गाबाबत समजण्यांत येते. आजचा विद्यार्थी हा उद्याचा जेष्ठ नागरीक असतो. नागरीकांच्या भल्या बुऱ्या वर्तनाचा परिणाम समाजावर होत असतो समाजमन हे अतिशय चंचल असतं. सागरी लाटाप्रमाणे समाजमन कधी उंचबळून येतं तर कधी ते स्थिर असतं पण या सर्व परिस्थितीत 'चांगभलं' ऐच समाजमनाला अभिप्रेत असं. स्वातंयाची ७० वर्षे आपण अनुभवली भू--भविष्य--वर्तमानाने आपण या स्वातंयांचा अंदाज घेऊ शकतो आणि या आधारेच आपण अचूक मार्गक्रमन करीत असतो. आजच्या युवा पिढीसमोर अनेक समस्या उभ्या आहेत. वाढते औद्योगीकरण लोकसंख्या आणि सरकारचे आर्थिक नियोजनाचे धोरण या सर्वामध्ये सामान्य माणूस अगदी भरडल्या जातो आहे. पुर्वापार चालत आलेली शिक्षण पध्दती, बेकारीची वाढती संख्या, याची योग्य ती सांगड न घातल्यामुळे येणारी युवा पिढी काळाच्या ओघात आपले अस्तित्व टिकविणार की नाही. नोकरीचे दरवाजे सध्यातरी त्यांच्यासाठी बंदच आहेत. मग सारा वेळ कुठे घालवायचा हा एक मोठा प्रश्न आहे. यातूनच पुढे दहशतवादाला खतपाणी मिळेल की काय?ही भिती डोळयाआड करताच येत नाही.

आज देश संक्रमणावस्थेत वावरतो आहे. अनेक मानव निर्मीत व नैसर्गिक संकटाने जनसामान्यांचे जगणे विज्ञकदून टाकले आहे. आज आपण संगणक, मोबाईल, अणुशक्ती, सॅटेलाईट च्या जगात वावरत असलो तरी आपण जीवन काहीस अस्थिरतेकडे जात असल्याची चाहूल मनाला लागून राहते.

या वार्षिकांकाच्या माध्यमातून या संस्थेच्या वर्षभरात घडणाऱ्या जवळपास सर्वच महत्वाच्या घटनांची आम्ही दखल घेण्यांचा प्रयत्न केलेला आहे. विद्यार्थ्यांच्या निर्मितीशीलतेला वाव देणे हे तर अंकाचे प्रमुख उदीष्ट प्रत्येकाचे लिखाण अंकात असावे अम्हालाही वाटते परंतू वार्षिकांकाचा दर्जा सांभाळतांना संपादक मंडळला अनेकांचे लिखाण इच्छा नसतांनाही बाजूला ठेवावे लागते. विद्यार्थी मित्र उमद्यामनाने आम्हाला त्याद्दल माफ करतील अशी आशा आहे.

या अंकाच्या पूर्ततेसाठी ज्यांनी हातभार लावले त्यांच्या ऋणातून मुक्त होता येणार नाही. श्री अमर शिक्षण प्रसारक संस्था, मंगरुळपीर चे संस्थापक सचिव मा.आ.अ.राठोड साहेब यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभले. त्यांच्याच संपूर्ण सहकार्याने हा वार्षिकांक आपल्या हाती देतांना आनंद वाटतो.

ज्यांनी प्रत्यक्षाप्रत्यक्ष या कामात सहकार्य केले त्या सर्वांचे आभार मानणे मी उचीत समजतो.

ऋणनिर्देश
प्रा.डॉ.एस.ए.राठोड

टिप :- 'अमरवाणी' वार्षिकांक मधील लेख व कवितेतून व्यक्त झालेली मते सबंधिताची आहे.



Scanned with OKEN Scanner

# - मनोगत -

मनोगत...

मंगरुळपीर या तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या श्री वसंतराव नाईक कला व श्री अमरसिंग नाईक वाणिज्य महाविद्यालय ज्या संस्थेच्या माध्यमातून उभे केले आहे त्या श्री अमर शिक्षण प्रसारक संस्था मंगरुळपीर जि वाशिम या संस्थेने संस्थापक सचिव मा.आ.अ.राठोड साहेब यांनी सदर संस्थेची स्थापना १९७१ मध्ये एका निश्चित्त ध्येयाला समोर ठेवून केलेली आहे. मुळातच प्रगल्भ शैक्षणिक दृष्ट्रीकोन आणि क्रीडा व आरोग्याविषयी सकारात्मक विचारसरणी, ही या संस्थेच्या उभारणी मागे आहे. त्याच माध्यमातून ग्रामिण तथा शहरी भागातील विद्यार्थ्यांच्या एकूणच विकासासाठी त्यांनी आपल्या संस्थेच्या माध्यमातून कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयाची उभारणी केली आहे. आज मितीला संस्थेच्या माध्यमातून ज्ञानदानासाठी उभे असलेले ग्रामिण भागातील एकमेव महाविद्यालय समजल्या जाते. कोणत्याही प्रकारचा राजकिय वारसा किंवा अवाजवी साधन--सामुग्री नसलेल्या एका व्यक्तीच्या ध्येयानिष्ठचे व समाजोन्मुख विचाराचे हे ज्वलंत प्रतीक आहे. यातूनच त्यांच्या शैक्षणिक दृष्टीचा लोक कल्याणाचा व तळमळीचाही प्रत्यय आपणास येतो. संस्था म्हटले की, त्यायोगे जनसामान्यांच्या दृष्टीने एक समज रुढ झालेला असतो निव्वळ शिक्षण संस्थांच्या माध्यामातून व्यवहार करणे हेच उदिष्ट संस्थापकाचे असल्याचे अलिकडील काळात आपणांस अनुभवायास मिळते. मात्र मा.आ.अ.राठोड साहेब हे अशा समज--गैरसमजाच्या बाबतीत इतरांपेक्षा भिन्न आहेत याचा प्रत्यक्ष अनुभव त्यांच्या सहवासात, त्यांनी स्थापलेल्या महाविद्यालयात काम करतांना आम्हाला आलेला आहे. पुढेही सातत्याने येत राहील.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या तसेच शहरातील सामान्य गरीब विद्यार्थ्यांच्या विविध समस्यांचे व प्रश्नांचे आकलन असल्यामुळेच त्यांना शैक्षणिक प्रवाहात तारण्याच्या दृष्टीने, वेगवेगळया माध्यमातून, आम्हा सर्वांच्या प्रयत्नाने या शैक्षणिक संकुलामध्ये कसोशीचे प्रयत्न केले जातात. या भूमितील अनेक विद्यार्थी मोठमोठया हुद्यापर्यंत पोहचले असून त्याच्याच वाणीतून त्यांच्या गुण वैशिष्टयांचे कथन ऐकण्यांस मिळते. त्यामागे मा.आ.अ.राठोड साहेबांची प्रचंड मेहनत अन् रात्रं--दिवसाची कृतिशील देखरेख ही आहे. हाती घेतलेल्या कामाला अंतिम रुप देण्यांचे साहेबांचे कौशल्य, इतरानाही प्रेरणादायी ठरावे अशाच स्वरुपाचे आहे. गेल्या ४५ वर्षापासून शहरामध्ये उभे असलेले हे महाविद्यालय गरज व वंचित घटकांची आधारशीलाच ठरले आहे. प्रस्थापित--प्रतिष्ठीत महाविद्यालयाच्या तुलनेत या ठिकाणी प्रत्येक विद्यार्थ्याकडे जाणिवपूर्वक लक्ष देण्यांचे काम अनेक वर्षापासून साहेबांच्या देखरेखीत इथे घडते आहे. स्वत: साहेब विद्यार्थ्यांशी संवाद साधतात असा संस्थापक, शिक्षक मिळणे विरळच! भविष्याचा वेध घेणारे ज्ञान आपल्या संकुलात मिळावे, असा त्याचा सततचा आग्रह! ते आपल्या आवर्तामध्ये पूर्णत्वाकडे नेत आहेत. म्हणूनच आधुनिक काळात शैक्षणिक क्रांतीच्या दृष्टीने कालसापेक्ष अग्रेसर आहे. आपल्या कृतीतून समाज जीवनाला काहीतरी घ्यावे हा त्यांचा हेतू या ठिकाणी फलदायी झाल्याचे आपणांस दिसते. साहेब हे उच्च विद्याविभूषीत असल्याने विविध ज्ञानशाखांचे व विषयाचे त्यांचे ज्ञान अनेकांना अवाक् करायला लावते. त्याची ज्ञानसंपादन आणि आकलन क्षमता अनेकदा अनुभवतो. स्वत: प्राचार्य पदाची धुरा त्यांनी सांभाळली असल्याने, प्रशासकीय अनुभव आणि त्यांची निर्णय क्षमता अतिशय भारदस्त आहे. प्रचंड ध्येयशक्ती, शैक्षणिक विकासासाठीचा उच्च कोटीचा ध्यास, हे त्यांच्या व्यक्तीमत्वाचे महत्वाचे वैशिष्टये आहेत. त्यामुळे सर्वांना निर्णय प्रक्रियेत सामावून घेणारी त्यांची विचारधारा ही, आम्हा सर्वांनाच विधायक विचार व सुखद अनुभूती देणारी आहे. अशा लोकप्रिय मा. साहेबांच्या दीर्घायुष्यासाठी--सुखसंपन्न आरोग्यासाठी मी ईश्वरचरणी प्रार्थना करतो.

मा. राठोड साहेबांच्या मार्गदर्शनाने हे महाविद्यालय प्रगतीचे एकेक पाऊल पुढे टाकीत आहे. प्रगतीचा हा ओघ सतत पुढे सरकत राहिल असा विश्वास आहे.

कार्यकारी प्राचार्य
डॉ.एस.ए.राठोड



Scanned with OKEN Scanner

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १) जीवनातील यश | :— | कु जयश्री हरीदास परंडे, बी.कॉम.भाग— ३ |
| २) आयुष्य कसे जगावे | :— | कु अश्विनी संजय घोटे, बी.कॉम.भाग— ३ |
| ३) तरुणाना संदेश | :— | कु लक्ष्मी नामनोर, बी.ए.भाग— ३ |
| ४) आई | :— | निलेश अशोक चव्हाण, बी.ए.भाग— ३ |
| ५) बाप | :— | कु किर्ती जानराव चौधरी, बी.ए.भाग— ३ |
| ६) प्रेम करणं पाप आहे का? | :— | आसिफ तसलिम मोहनावाले, बी.ए.भाग— ३ |
| ७) आई | :— | कु पुजा हरीदास परंडे, बी.कॉम.भाग— १ |
| ८) बाप | :— | कु पुजा हरीदास परंडे, बी.कॉम.भाग— १ |
| ९) शेतकरी राजा | :— | कु पुजा हरीदास परंडे, बी.कॉम.भाग— १ |
| १०) न मिळणारं प्रेम | :— | कु वैष्णवी सुभाष डेरे, बी.कॉम.भाग— १ |
| ११) वेलंटाईन डे | :— | कु वैष्णवी सुभाष डेरे, बी.कॉम.भाग— १ |
| १२) जबरदस्त लगीन | :— | कु योगीता माणिक पाचे, बी.ए.भाग— ३ |
| १३) आधुनिक मुलगी | :— | कु योगीता माणिक पाचे, बी.ए.भाग— ३ |
| १४) आग लागली... | :— | विपूल रंगराव चव्हाण, बी.कॉम.भाग— ३ |
| १५) आई | :— | कु रेश्मा संजय म्हातारमारे, बी.ए.भाग— २ |
| १६) वेदकालीन स्त्री—दर्जा | :— | प्रा.सी.एन.घुगे |
| १७) उपयोजित मराठीचे महत्व | :— | डॉ.एस.ए.राठोड |
| १८) भारतातील पर्यावरण संरक्षणविषयक कायदेशिर तरतुदी | :— | प्रा.पी.आर.तायडे |
| १९) शारीरिक शिक्षण विभाग | :— | प्रा.एस.जी.ढाकुलकर |
| २०) बिटकॉईन मध्ये गुंतवणूकीच्या संधी व संभाव्य धोके | :— | डॉ.एल.एस.हूरणे |
| २१) अर्थशास्त्र विभाग | :— | प्रा.एन.बी.मठपती |
| २२) वाणिज्य विभाग | :— | प्रा.ए.एन.गजभिये |




Scanned with OKEN Scanner

# ✻ जीवनातील यश ✻

''उडत्या पाखरांना परतीची तमा नसावी, नजरेत सदा नवी दिशा असावी,
घरट्याचे काय आहे, बांधता येईल कधीही, क्षितीजापलीकडे झेप घेण्याची जिद्द असावी.''

जीवनामध्ये आपल्याला किती यश मिळाले व किती कमवले याच्यावर कधीही गर्व करु नका. कारण, ''बुध्दिबळाचा खेळ संपला की, सगळे मोहरे आणि राजा एकाच डब्यात ठेवून दिले जातात.''

आयुष्याच्या वाटेवर चालत असतांना चढ आणि उतार येत असतात. तर त्याला आपल्याला पार करायचे असते, खचून जाऊन थांबायचे नसते. कारण ''यशाजवळ पोहोचण्यासाठी कधीही शॉर्टकट नसतो'' जिवनामध्ये यश हे कितीही दूरचे असले, तरी त्याच्याकडे जायचे म्हणजे प्रथम एक पाऊल टाकूनच प्रारंभ करावा लागतो. व तसेच करित गेले म्हणजे हळूहळू आपण यशाजवळ पोहोचतो कारण ''कोणतीही अडथळे नसलेली साधी वाट कशाचेही नेतृत्व करु शकत नाही''

आयुष्यामध्ये यश मिळवायचे असेल तर आपण काय आहोत?यापेक्षा आपण काय करु शकतो याचा विचार करणे आवश्यक आहे. कारण आपल्याला ठरवायचं असतं की आपल्याला डबकं व्हायच की झुळझुळ वाहणारे झऱ्याचे पाणी,

''डबक्यावर डास असतात, नी झऱ्यावर राजहंस''

आपल्यापासून यश दूर जाणे म्हणजे आपण कोठेतरी थांबलो आहे, तर थांबायचे नाही कारण, ''धावत्या पाण्यालाच योग्य मार्ग सापडतो'' मला यश मिळाले नाही त्यासाठी आपण नवीन कारणे शोधत असतो. परंतू चूका हया प्रत्येकाकडून होत असतात जेव्हा आपण नवीन चूक करित असतो तेव्हाच आपली प्रगती होत आहे असे समजावे कारण जगात अशक्य असे काहीच नाही. जीवनामध्ये यशाकडे वाटचाल करतांना अनेक साथीदार आपल्याला मिळत असतात, परंतू त्यांच्यामध्ये कुणाला कमी लेखू नये किंवा तुच्छ समजू नये कारण हे सगळं बदलणार असतं.

''चालणारे दोन पायं किती विसंगत असतात,
एक मागे असतो, तर एक पाय पुढे असतो.
पुढच्याला अभिमान नसतो, व
मागच्याला अपमान नसतो, कारण त्यांना माहित असतं
क्षणात हे बदलणार असत, व याचंच नाव जीवन असतं''

जेव्हा सगळच संपून गेलंय असं आपल्याला वाटत तीच खरी वेळ असते नवीन काहीतरी सुरु होण्यांची, यश मिळत नाही म्हणूनखचून जाणे म्हणजे जिवंत असून मेल्याप्रमाणे आहे. म्हणतात ना, ''गुणांचे कौतूक उशीरा होत, पण होतंच!'' म्हणून प्रयत्न करणे आवश्यक आहे. कारण

''उष:कालाकडे जाण्यांचा एकमेव मार्ग असतो तो म्हणजे रात्र''

''गरुडाइतके उडता येत नाही, म्हणून चिमणी कधी उडण्याचे सोडत नाही.'' म्हणून आपण काय आहे यापेक्षा आपल्याला काय हवे हे लक्षात घ्यावे. त्यासाठी विचार व स्वप्ने आपल्याजवळ असायला हवी.

''स्वप्न ती नसतात जी आपल्याला झोपल्यावर पडतात.
तर स्वप्ने ती असतात जी आपल्याला झोपू देत नाही''

आपल्याला आपले ध्येय गाठण्यासाठी स्वप्न पाहणे व ते स्वप्न, तसे विचार कृतीत आणणे आवश्यक आहे. विचार हेतूकडे नेतो. हेतू कृतीकडे नेतो. कृतीमुळे सवय लागते व सवयीमुळे स्वभाव बनतो व आपल्याला यश प्राप्त होते आपल्याला यश प्राप्त झालं हे कुणाला सांगाव लागत नाही. कारण

''आपण चंदन असल्याची घोषणा चंदनाला कधीच करावी लागत नाही,
त्याचा गंध आपोआपच वाऱ्याबरोबर परसत जातो.''

यश मिळवणे हे आपल्या हातात आहे म्हणून, ''हातावरिल रेषेत दडलेले भविष्य बघू नका, त्याच हाताने कष्ट करा व स्वत:चे भविष्य घडवा, व जीवनाला आकार दया'' तेव्हांच

''स्वप्न जिथे साकार होते, जीवन तेथे आकार घेते,
जेव्हा स्वप्नातली कल्पना व कल्पनेतील स्वप्ने
सत्यात उतरतात, तेव्हाच जीवन खऱ्या अर्थाने परिर्ण होते''

## ✲ आयुष्य कसे असावे? ✲

जीवनातील दु:ख आणि वेदना चुपचाप सहन करा त्यावर स्वत: पर्याय शोधा. आपल्या दु:खाची वाच्यता करित इकडे तिकडे फिरु नका. त्यावर उपचार करणारे लोक डॉक्टर नाहीत. जे तुमच्या दु:खाचे निवारण करतील. हे जग फार वाईट आहे कारण रडत रडत तुमचे दु:ख विचारतील आणि हसत हसत जगाला सांगतील. चेहऱ्यावर तेज असायला हवं. देहामध्ये शक्ती हवी. मनामध्ये उत्साह हवा. बुध्दीमध्ये विवेक आणि हृदयामध्ये करुणा तसेच मातृभूमीवर प्रेम असाव. इंद्रियांवर संयम असावा. मन त्यांचे स्थिर असावं. आत्मविश्वास दृढ आणि इच्छाशक्ती प्रबळ असावी आपल्यामध्ये धाडसाचे बळ असायला हवं आणि सिंहासारखी निर्भयता ध्येय ज्याचे उच्च आहे, सत्य त्याचा ईश्वर असायला पाहिजे. व्यसनांपासून मुक्त असायला हवं. जिवनामध्ये शिस्त हवी. प्रेमळ सूर असावा. मानवता हे कुळ असावं. गुरुजनांचा आदर करावा. पालकांवरती श्रध्दा असावी. दिनदुबळयांचा मित्र असावं. सेवेसाठी तत्पर रहावं. देवावरती भक्ती ठेवावी. आणि जिवनामध्ये निती असावी. चारिंय ज्याचे शुध्द तोच आदर्श व्यक्ती असतो.

देवाने आपल्या शरीराची रचनाच अशी केलेली आहे की, आपण स्वत:ची पाठही थोपटू शकत नाही आणि स्वत:ला लाथही मारु शकत नाही म्हणूनच माणसाच्या जीवनात हितचिंतकाची आणि निंदकांची आवश्यकता आहे. आयुष्यात असे लोक जोडा, जे वेळ येईल तेव्हा तुमची सावली अन् वेळेला तुमचा आरसा बनवतील कारण आरसा कधी खोट बोलत नाही. आणि सावली
कधी साथ सोडत नाही.

पुजा करायच्या आधी, विश्वास ठेवायला शिका.
बोलायच्या आधी, ऐकायला शिका
खर्च करायच्या आधी, कमवायला शिका
लिहायच्या आधी, विचार करायला शिका
हार मानण्याआधी, प्रयत्न करायला शिका
आणि मरायच्या आधी
जगायला शिका जगायला शिका

कु अश्विनी संजय धोटे
बी.कॉम.भाग– ३

---

## ✲ तरुणांना संदेश ✲

''उठा जागे व्हा आणि धैर्य साध्य होई पर्यंत कार्यरत रहा''

हे तरुणा!, तू जर मनावर घेतल तर या अवनतिच्या पुरातून तू तरला जाशिल. नाहीतर तुझा अंत आहे. म्हणून जे कोणी समर्थ असतील त्यांनी पुढे होवून जे बुडत असतील त्यांना हात देवून वरती काढून या उन्नतीच्या पैलतीरास नेतील. तरी या विटाळरुपी डोहांत बुडण्याऱ्यांनो, तुम्ही आपल्या जुन्या रुढीच्या मगरमिठठीतून निसटून आपणच आपला मार्ग सुधारा, नाहीतर आपले व्यर्थ हाल होतील.

जे झाले ते गेले, जे होणार ते जाणार, म्हणून आज जिवंत असलेले तुम्ही चाललेली घडी वाया जाऊन देता, पुढे व्हा. आणि आपल्या ज्ञानबांधवास हात दया, व आपल्या बरोबरीने पुढे आणून जगामध्ये आपले नाव करुन दाखवा. ज्याप्रमाणे अंधारातून उजेड, अशुभातून शुभ व निराशेतून दैवी अशा फुटते. तद्वतच आपल्या या आज्ञान समाजातून सज्ञान, अशक्तातून सशक्त बनून, प्रकाशमान दिवे होवून आपापल्या ज्ञानबंधुस खरे मार्गदर्शक व्हा! आणि त्यास समाजातील, या जगातील खऱ्या आनंदाचा परामर्श देवून त्या विधात्यास, त्याच्या रुपकांचा नित्यश: होत असलेला अपमान दु:खाच्या भाराखालून अशंत: तरी दूर करण्याचा प्रयत्न करा. तो तुम्हाला दिलेल्या अचाट शक्तीला, अलौकीक धैर्याला अजमावून पाहत आहे.

''तैसी करणी करेगा तो नरका नारायण बन जायगा'' हे वचन खरे करुन दाखवा.

कु लक्ष्मी नामनोर
बी.ए.भाग– २



Scanned with OKEN Scanner

# ✻ आई ✻

''घेवूनीया माय माऊलीचे नाव, करुया लेख लिहण्यास सुरवात''

आई म्हणजे काय असते, या विषयावर अनेक लेखकांनी अनेक लेख लिहीलेत कवी कवयत्रीने अनेक कविता केल्यात. ज्यांनी ज्यांनी लेख आणि कविता केल्या त्यांनी आपल्या कवितेत आणि लेखनात आपल्या कल्पना शक्ती नुसार आई विषयी रेखाचित्रे रेखाटली आहेत. आई या शब्दाचा अर्थ सांगण्यासाठी कोणाच्याही व्याख्या अपूऱ्या पडतात. आई हा शब्द एवढा व्यापक आहे. ते एका शब्दात किंवा वाक्यात कसे समजेल. आई या शब्दाची व्यापकता किती आहे हे पुढील कवितेच्या शब्दात प्रगट करता येईल.

''आई तूझी व्यापकता सांगू कशी, सांगता सांगता गेलो आकाशी
तरी कमी पडे तूझे गुण गाता, गाता धरती बण् पाताळाशी
तरी तूझे गुण न संपते कशी, सांग माय माहुली माझी कशी
करु तुझी ख्याती, म्हणून नतमस्तक होतो तुझ्या चरणाशी
धन्य कर मला तुझ्या पावन पायाच्या स्पर्शासी''

अशा प्रकारे आई या शब्दाची अवाढव्य व्यापकता स्पष्ट करता येईल. आई हा शब्द एवढा व्यापक स्वरुपाचा आहे की, त्याचे वर्णन करतांना धरती आकाश आणि पाताळ या तिन्ही जग अपूरे पडतील. म्हणूनच एक यशवंत या आपल्या कवितेत म्हटले आहे की,

''स्वामी तिन्ही जगाचा, आई विना भिकारी''

व्यक्ती जवळ कितीही धन, संपत्ती असेल पण त्याच्या जवळ आई नसेल तर तो जगात सर्वात भिकारी, अभागी, दुर्भागी समजला जातो. आई या शब्दाचे वर्णन करण्यासाठी ज्या प्रमाणे पाण्यांत साखर टाकल्यास दोन्ही जसे समरुप होतात. त्याच प्रमाणे आईशी समरुप व्हावे लागते.

आई ही स्त्री आपल्या कुटूंबातील लहान मोठया सर्व सदस्यांना सुखी व समाधानी ठेवण्यासाठी सकाळीच चार वाजेपासून तर रात्रीचे दहा वाजतात. म्हणजेच सन्हास सलग पंधरा ते सतरा तास राबत राहते. एखादया यंत्राप्रमाणे त्याला चिंता असते की फक्त आपला कुटूंबाला दुख:ची जाणिव न होवो. सुखात रहावे यासाठी ती स्वत:चे सर्व सुख सोईचा त्याग करते त्या स्त्रीला या त्यागाच्या मोबदल्याची कोणतीही अपेक्षा ठेवत नाही. आणि जेणेकरुन त्याच्या मोबदल्यात ती मागते तर देवाकडे फक्त प्रेम आणि देवापासून स्वत:साठी काही न मागता कुटुंबासाठी देवाकडून आपल्या कुटुंबाची सुखरुपता व प्रेम भावणेची भिक मागते एका हिन्दी चित्रपटात म्हटल्या प्रमाणे —

''प्रभु मेरे घर को प्यार करो
प्रभु मेरे घर का उध्दार करो
प्रभु ये कृपा वारंवार करो.
प्रभु मेरे घर को प्यार करो''

वरील ओव्या 'सुपर मानी' या निपटातील आहे आणि ती परिस्थिती वास्तविक जिवनात आहे. आई ही एवढी त्यागी वृत्तीची असते की ती आपल्या कुटुंबासाठी आपल्या जीवनाची रान–रान करुन हाडाची काडे करते तरी कुटुंबाची संरक्षण आणि संवर्धन करते. म्हणून आई वडीलांचे उपकाराची कधीच परतफेड करता येत नाही. ती आपण विसरता कामा नये, त्यांच्या उपकाराचे ऋणी रहावे.

समाजातील एक वास्तविकता सांगायची आहे ती म्हणजे स्त्री–पुरुष यांच्या विचारात आणि प्रेम, भावना, दया, करुणा यांच्यातील तफावता संबंधीत एखदया स्त्रीचे लग्न होवून तिन–चार वर्षे दौरान तीच्या पतीचे अनावधानाने आपघातात अकाली मृत्यु झाला असेल आणि त्या स्त्रीला एकही आपले वा मुले असतील तरी ती दुसऱ्यांदा लग्न करण्याचा संबंध असा विचारही त्याच्या डोक्यात बिंबावणारही नाही. ती आपली मुले घेवून आपला संपूर्ण जीवन त्यांच्या पालन पोषण करण्यांतच खपवेल. ज्या प्रमाणे पावसाळयात पाऊस सुरु होतो आणि कोंबडी आपल्या पिल्यानिशी जवळ घेवून आपल्या पंख्यात झाकून ठेवते त्याच प्रमाणे आई ही समाजातील निंदक टवाळेखोर, पासून संरक्षण करुन आणि अवदसा, पांढरपाई, अशा वाईट शब्दाची झडी आपल्या अंगावर होवून आपल्या मुलांचे रक्षण करते अन आपला जीवन जगत असते पण या स्थिती बाबत पुरुष मंडळीची तुलना करतांना असे आढळून येते की, एकीकडे त्यांच्या पत्नीचे तेरवीचे कार्यक्रम पूर्ण होत नाहीत तर ते दुसरीकडे लग्न जुळविण्या बाबत कुचबुच करतो आणि लग्न करण्यांसाठी ना हरकत मंजूरी देतो त्याची स्वत:ची मुले जरी त्याच्या खादयाला खांदा लावणारी असली तरी तो लग्न करण्यांस तयार होतो. पण आपण दुसरा लग्न करुन मुला–मुलींसाठी सावत्र आई आणणे म्हणजे त्यांना आपल्यापासून वेगळे करण्या खेरीजच असते. पण असे विचार त्यांच्या मनात कधिच बिब्बवनार नाही. म्हणून आई ही आईच असते त्या माउलीची जागा सहजच कोणी घेवू शकत नाही आपल्या मुलाला किंवा मुलीला साधी ठेच जरी लागली असेल आणि ती त्यांपासून कितीही अंतरावर असेल तरी तीच्या हृदयात जाणवते की माझ्या बाळांवर काहीतरी संकट ओढविला गेले आहे. म्हणून ऐवढेच काय तर आई ही मुला मुलींच्या पायाच्या आवाजावरुन ओळखून घेते व आई जवळ अंतर्गत मनाची ऐवढी जास्त शक्ती असते की आपल्या मुलाच्या चेहऱ्यावरुन ओळखून घेते की याला काय हवे आणि ती इच्छा पूर्ण करते ती स्त्री म्हणजे आई ज्याला आपल्या सुखापेक्षा आपल्या कुटुंबाच्या सुखाची व्यवस्था करणारी स्त्री म्हणजेच आई.

एक साधा उदाहरण दयायचे झाल्यास जेवण करण्यांच्या वेळी आई सर्व कुटुंबातील व्यक्तींना वाढण करते आणि जो पर्यंत कुटुंबातील सर्व व्यक्ती जेवण करुन तृप्त होत नाही तों पर्यंत ती सतत वाढत राहते आणि ती त्याच्या स्वत:साठी काही अन्न आहे की नाही याचा विचार कधिच न करणारी स्त्री म्हणजेच आई, आईचे महत्व त्यांना विचारा की ज्यांना त्यांच्या आईने त्यांना लहानपणीच किंवा त्यांचे पाय पाळण्यांत असल्या वेळेस सोडून जाते. त्यांची आई स्वर्गवाशी झालेली असते त्यांना चांगल्याच प्रकारे आई काय असते हे कळेल जेव्हा एखादी वस्तू जो पर्यंत आपल्या जवळ असते तो पर्यंत आपण त्याची किमत करीत नाही पण ज्या वेळेस ती महाण वस्तू आपल्या पासून हरवल्या जाते त्यावेळी त्या वस्तूचे महत्व कळते. आपण आईच्या शरीराचा अंश असतो आणि आपला सर्वात मोठा, महान, पहिला गुरु असते ती म्हणजे आईच. आण कातीही जन्म घेतले तरी आपणांस ते जन्म कधीच पडतील ते म्हणजे त्या जन्मदात्री, जननी, आई ची उपकाराची परतफेड करण्यांसाठी म्हणून असे म्हणावेसे वाटते की,

'ईश्वरा चरणी एकच प्रार्थना ठेवितो.
अन पून्हा एकदा त्याच माय माऊलीच्या
पोटी जन्मास घालीस अशी आशा ठेवितो
मान्य करशिल माझे हे बोल म्हणूनी पुन्हा घालतो तूला एकदाची नमन'

गणपतीने ही आपल्या आईला म्हणजेच पार्वतीला सर्वकाही मानले आहे. पृथ्वीच्या प्रर्दशिणा घालण्या ऐवजी तो आपल्या आईच्या अवती–भोवती प्रर्दशिना घालतो आणि आपल्या आईला पृथ्वीची उपाधी देतो.

निलेश अशोक चव्हाण
बी.ए.भाग– ३



Scanned with OKEN Scanner

# ❊ बाप ❊

आई घराचं मांगल्य असते, तर बाप घराचं अस्तित्व असतो. पण घराच्या या अस्तित्वाला आपण कधी आम्ही समजून घेतलेल आहे का? वडीलांना महत्व असूनही त्यांच्या विषयी जास्त बोलल जात नाही लिहल जात नाही. कोणत्याही व्याख्यात आईविषयी जास्त वेळ बोलत राहतो. संत महात्म्यांनी आईचेच महत्व अधिक सांगीतलेल आहे, देवदेवतांनी आईचेच तोंड भरुन कौतूक केले आहे. चांगल्या गोष्टींना आईचीच उपमा दिली जाते. पण बापाविषयी कुठेच फारसं बोलल जात नाही, काही लोकांनी बाप रेखाटला पण तोही तापट, व्यसनी, मारझोड करणारा समाजात एक—दोन टक्के बाप असे असतील ही पण चांगल्या वडीलाबद्दल काय?

आईकडे अश्रुचे पाट असतात पण बापाकडे संयमाचे घाट असतात आई रडून मोकळी होते पण सात्वन वडीलांनाच करावे लागते आणि रडणाऱ्यापेक्षा सात्वन करणाऱ्यावर जास्त ताण पडतो. कारण ज्योतीपेक्षा समईच जास्त तापते ना! श्रेय नेहमी ज्योतीलाच मिळते. रोजच्या जेवणाची सोय करणारी आई आमच्या लक्षात राहते. पण आयुष्याच्या शिदोरीची सोय करणारा बाप आम्ही किती सहज विसरुन जातो आई रडते वडीलांना रडता येत नाही. स्वत:चा बाप आपण किती सहज विसरुन जातो कारण छोटया भावंडांना जपायच असते. आई गेली तरीही रडता येत नाही कारण बहीणीचा आधार व्हायचं असते. पत्नी अर्ध्यावरच साथ सोडून गेली तर पोरांसाठी अश्रूंना आवर घालावा लागतो.

जिजाबाईंनी शिवाजी घडवला अस अवश्य म्हणाव पण त्याचवेळेस शहाजी राजांची ओढताण सुध्दा लक्षात घ्यावी. देवकिचं यशोदेचे कौतूक अवश्य करावे पण पुरातून पोराला डोक्यावर घेऊन जाणारा वासुदेव लक्षात ठेवावा. राम हा कौसल्याचा पुत्र अवश्य असेल पण वियोगात तडफडून मरण पावला तो पिता दशरथ होता. वडीलांच्या टाचा, झिजलेल्या चपलांकडे पाहिलं की त्याच प्रेम कळते. त्याची फाटलेली बनियन पाहिली की कळत आमच्या नशीबाची भोक त्यांच्या बनियनला पडली आहेत. त्यांची दाढी वाढलेला चेहरा त्यांची काटकसर दाखवतो.

मुलीला—मुलाला नवीन कपडे घेतो मात्र स्वत: जुनी पॅन्ट वापरायला काढतील. मुलगा सलूनामध्ये वीस पंचविस रुपये खर्च करतो, मुलगी ब्यूटी पार्लरमध्ये तीनसेक रुपये खर्च करते पण त्याच घरातला बाप दाढीचा साबण संपला म्हणून आंघोळीच्या साबणाने दाढी खरडत असतो. बाप आजारी पडला तरी पटकन दवाखान्यात जात नाही. तो आजाराला मुळीच घाबरत नाही कारण पोरीच लग्न, पोराच शिक्षण बाकी असतं. घरात उत्पन्नाच दुसरं साधन नसत ऐपत नसते तरीही मुलगा उच्च शिक्षणाला बाहेरगावी शिक्षणाला पाठवला जातो. ओढताण सहन करुन त्या मुलाला दर महिन्याला पैसे पाठविले जातात. काही मुल अशीही असतात की जे तारखेला पैसे येताच मित्रांना पार्टी देतात आणि ज्या बापांनी पैसे पाठविले त्याच बापाची टिंगल करतात, एकमेकांच्या बापाच्या नांवाची एकमेकाला हाका मारतात.

आई घराचं मांगल्य असेल तर बाप घराचं अस्तित्व असतो, ज्या घरात बाप आहे त्या घरातला कर्ता जीवंत असतो तो जरी काहीही करत नसला तरीही तो त्या पदावर असतो आणि घर सांभाळत असतो कोणाचा मुलगा होण टाळता येत नाही पण बाप होण टाळता येत पण बाप कधीच बाप होण्यांच टाळत नाही.

कोणत्याही परीक्षेचा निकाल लागल्यावर आई जवळची वाटते कारण ती जवळ घेते, कवटाळते, कौतूक करते, पण मनातल्या मनात अंत:करणातून आर्शिवाद देणारा बाप कोणाच्याच लक्षात येत नाही. चटका बसला, ठेच लागली, तर आई ग! हा शब्द बाहेर पडतो पण रस्ता क्रॉस करतांना एखादा ट्रक जवळ येऊन ब्रेक अचानक लावतो तेव्हा बाप रे! हाच शब्द बाहेर पडतो. कारण छोटया संकटासाठी आई चालते पण मोठमोठी वादळ पेलतांना बापच आठवतो...

कोणत्याही मंगल प्रसंगी घरातली सर्व मंडळी जातात पण मयताच्या प्रसंगी बापालाच जाव लागत. कोणताही बाप श्रीमंत मुलीच्या घरी जास्त जात नाही पण गरीब लेकीच्या घरी उभ्या उभ्या का होईना चक्कर मारतो, मुलाच्या नोकरीसाठी साहेबांपुढे लाचार होणारा बाप, मुलीच्या स्थळासाठी उंबरठे झिजवणार बाप, घरच्यांसाठी स्वत:च्या व्यथा दडपणारा बाप... खरंच किती महान असतो ना?वडीलांना शेतात काम करतांना बघीतल्यावर राहावलं गेलं नाही आणि लगेच मन आणि हात चालतील असे लिहीत गेली.

बस बाबांसाठी एवढेच!

कु. किर्ती जानराव चौधरी
बी.ए.भाग— २

# * प्रेम करणं पाप आहे का? *

जीवनात ध्यानीमनी नसतांना नकळतच प्रेम होऊन जाते. प्रेमच आयुष्य होऊन जाते आणि ज्या व्यक्तीवर आपण प्रेम करतो. ती व्यक्ती आपल्यासाठी जणू जीव की प्राण होऊन जाते. आयुष्यात एकमेकांना आधार देऊन सुखी संसाराची स्वप्ने रंगवली जातात. मग प्रश्न येतो समोपचाराचा, प्रेम आंधळे असते, त्याला धर्म, जातपात नसते असे नेहमीच म्हटले जाते. परंतु प्रतिष्ठेपायी म्हणा किंवा इतर कारणांमुळे समाज आजही प्रेमविवाहाला मान्यता देत नाही आणि मग मन मारुन प्रेमाला तिलांजली द्यावी लागते.

'त्यानं प्रेम केलं, तिनं प्रेम केलं, सांगा तुमचं काय गेल ?असा रोकडो सवाल विचारणारी कविता मंगेश पाडगावकरांनी लिहीली, पण तरीही आजही प्रेम आणि लग्न या दोन विषयात तरुण पिढी त्याच त्या जुन्या प्रश्नांशी झगडते आहे. घरच्यांचा विरोध, समाजाची मान्यता, जातीपातीचे प्रश्न, सामाजिक विरोध आणि शेवटी बहिष्काराच्या तलवारी हे सारे प्रश्न आजही तरुन मुल–मुलींना छळत आहेत. प्रेमाला विरोध, इमोशनल, ब्लॅकमेल, जाणत्या मुलांना मन मारायला लावून मनाविरुध्द लग्न करायला भाग पाडण हे सार तर आपल्याकडे सर्रास होतेच. आजही मनापासून आवडलेल्या व्यक्तीची आपल्या जगण्याचा जोडीदार म्हणून निवड करण्याचं स्वातंय नाही. आजूनही कुटुंब आणि समाज यांच्यासाठी मन मारुनच जगावं लागतं. प्रेमात पडणं पाप आहे की, गुन्हा असं वाटाव, इतका समाज तरुण मुला–मुलींना छळतो. या कुचंबनेत कसं रुजणार प्रेम ?आणि कशी मिळावी उभारी प्रेमात पडून मनासारखं जगण्यांची स्वप्न पाहणाऱ्या तरुण मुलांना ?

आज सगळीकडे स्वतंत्र विचार, स्वातंयाच्या बाता मारल्या जातात. लग्न जुळवताना ते मुला–मुलीच्या संमतीनेच जुळवत असल्याचे चित्र रंगल्या जाते, पण तसे काहीच नसते. मुला मुलींच्या मनात उमलणारी तारुण्य सुलभ कोवळीक काही काळात करपून जाते, जणू ती समाजाकडून मारुनच टाकली जाते. हे कितीही नाकारलं. तरी वास्तव आहे. मुलं तरी थोडा फार विरोध करतील पण मुली काहीच करु शकत नाही. आपण फक्त हुशारक्या मारतो की, आज मुलींना मुलांच्या बरोबरीने स्थान दिल्या जात आहे मात्र ती स्वतः च्या मनाने तिचा आयुष्याचा जोडीदार निवडू शकेल एवढ स्वातंयही तिला नाही. मुली जाणून असतात त्यांच, त्यांच्या प्रेमाचं प्राक्तन, समोर येणाऱ्या जगण्याचा समंजस स्विकार म्हणजेच आयुष्य हे गृहितक खुप आधीच त्या गोंदून घेतात उरीपोटी, मात्र मनातले कद, कळत नकळत त्या खोलून दाखवतात, फक्त जिव्हाळयाच्या जागीच हे सार चालू असतांना दुसरीकडे असंही दिसतं की एरव्ही तरुण मुली एकमेकांना प्रेम प्रकरणांमध्ये जीवापाड मदत करतात, प्रसंगी जीव धोक्यात घालून आपण कसा एका मित्राचा विवाह, तोही प्रेमविवाह लावून दिला हे इतरांना फुशारक्या मारत रंगवून सांगतात, पण गोष्ट जेव्हा त्यांच्या सारख्या व अगदी चुलत बहिणीची किंवा अगदी जवळच्या नात्यातल्या मुलीची येते तेव्हा लगेच ही तरुण मुल. त्यांच्याही नकळत पुरुषी पवित्रा घेत पझेसिव्ह बनतात. आमच्या जातीतल्या, नात्यातल्या स्त्रियांनी कसे वागावे ते आम्ही ठरवू असा तो पवित्रा असतो. आणि जिथ ताकद, दमदाटी, धाक चालत नाही तिथ आई वा वडील स्वत: जीव देण्यांची धमकी देतात कायम कुटुंबकेंद्री आणि समर्पित वृत्तीसाठी गौरवलेल्या मुली मग सहज शरणागती पत्करतात. मुलींनी सहजीवनाबाबत थोड जरी स्वतंत्र विचार केला तरी तिच्या शिक्षणाला दोष दिला जातो. तुला आम्ही

एवढ शिकविले ते यान्यासाठी का? हे तिला ऐकवल जातं तू आम्हाला अनुकूल वागलीस तरच आमची असा सगळा अविर्भाव त्यात असतो. कुटुंबाचा सामाजिक चेहरा आणि जातीची खोटी प्रतिष्ठा जपण्याचे सगळे जोखड देहमनावर वागवत या मुली वावरत असतात आणि अनेकींच्या आठवणीत अकाली मेलेली स्वप्न पक्की कोरलेली असतात एखाद्या मुलाविषयी आपल्याला प्रेम वाटतंय हे सत्य त्यांना अपराध भाव देतं मग त्या संभ्रमात पडतात स्वत:लाच प्रश्न विचारतात, स्वत:चीच उत्तर शोधतात कधी चूक तरी कधी बरोबर. त्यातही काही बंडखोर मुली हे जोखंड झुगारुन पाहतात स्वत:ची जमीन नी स्वत:चं आकाश त्याची किमंतही त्या मोजतात, धडपडतात सावरतात बिकटवाटेला वहिवाट बनवतात पण अशा थोडक्यात.... बाकीच्यांच्या मनात मात्र कधीकाळी कुणाविषयी तरी वाटलेल्या प्रेमाच्या, कुणीतरी आवडल्याच्या आठवणी असतात... फक्त आठवणीच! एकमेकांपासून दूर पण एकमेकांसाठीच जगतात आणि म्हणतात.

''चॉंहू तो एक पल मे खत्म कर दुं ये जिंदगी,
लेंकिन किसी अपने ने कहा है,
बाते ये कभी ना तू भूलना कोई तेरे खातीर है जी रहा!''

भारतासारख्या धर्मनिरपेक्ष देशात जातीपातीपुढे आजही व्यक्तीगत भावना शुन्य ठरतात. एका मुलीच्या आयुषापेक्षा जात आणि समाज हे जास्त वरचढ ठरतात हे सार आपल्याच भारतात म्हणजे स्वत:ला धर्मनिरपेक्षा म्हणविणाऱ्या देशात घडतय स्वातंत्र्य प्राप्तीच्या ७० वर्षानंतरही आपल्या देशात तरुन उपभोगू शकत नाही. हे कसले नियम?आपला जोडीदार कसा असावा? तो आपण निवडावा हे मुलभूत स्वातंत्र्य आहे. हे देखिल आपल्या समाजाला आजही मान्य नाही. आणि एवढ करुनही कुणी पडलंच प्रेमात तर प्रेमाला घरचे स्विकारत नाहीत समाजमान्यता वाईट नजरा,कोणाकोणास स्पष्टीकरण देत फिरायचे?आपल्या भारतात एखाद्या बलात्कार झाल्यास आपण सगळे मोर्चे काढत रस्त्यावर उतरतो, मेणबत्या हातात घेवून आंदोलने करतो, नराधमांना फाशी देण्यांची मागणी करतो पण मुलींना मन मारायला लावून, प्रेम विसरायला लावून तिच्यावर जो समाजमान्य बलात्कार होतो, त्यासाठी का बर कोणी रस्त्यावर उतरत नाही? तेव्हा कोठे जाते आपली समाजप्रतिष्ठा?तेव्हा काबर आपण डोळया देखत बलात्कारास विरोध करत नाही. प्रेमाला विरोध करणारा समाज असतो तर लग्नानंतर होणाऱ्या 'समाजमान्य बलात्कारासही' समाजच जबाबदार असतो.

समाजाच्या या विरोधामुळेच तर आपल्या प्रेमाची अमर कहानी लिहणारे हिरे—रांझा, लैला—मजनू, सोहनी—महिवाल, रोमिओ—ज्युलिएट, सलिम—अनारकली, निर्माण होतात आणि प्रेमाच्या पावित्र्याला एका वेगळयाच उंचीवर नेतात. पण तरीही कुणांचाही प्रेम अधुर राहूच नये.

शेवटी एवढच म्हणावस वाटतं,

''ऐ खुदा! अगर तेरी कलम की स्याही खत्म है,
तो मेरा खुन ले ले,
लेकिन यु कहॉं नियॉं अधुरी ना लिखा कर!''

आसिफ तसलीम मोहनावाले
बी.ए.भाग—३

## ✻ आई ✻

आई आली शेतातून बसली माझ्या समोर
थकलेला चेहरा नि शरीर घामाजोर,
तेव्हा मला आई या शब्दाची झाली जाणिव
आई या शब्दाला नाही कोणती उणिव,
नाही केला कंटाळा बसली भाकरी करायला
सर्वांचे जेवण झाल्यावर भांडी आवरायला,
गुरफटलेलं मन तिचं विचारांसी
पोलीस होवून मुलगी माझी भांडेल चोरांशी,
सांगितल तिने मला नाव कर मोठ
मरण पत्काराव पण बोलू नये खोटं,
असे आहे तिचे श्रेष्ठ विचार
शिकविले तिने मला जिवनाचे सारासार,
असी तेहत्तीस कोटी देवाहून श्रेष्ठ माझी आई
कुठेही असो मी, माझ्या काळजात ती राही.

कु पुजा हरीदास परंडे
बी.कॉम.भाग— १

---

## ✻ बाप ✻

ज्यांच मुलांवर प्रेम असतो, पण ते कधीच दिसत नसते
त्याचच तर नांव बाप असते, रात्रंदिन तो कष्टाचे ओझे वाहतो
व घरातील सदस्यांना सुखी ठेवतो,
घरात दु:ख असून सुध्दा त्याला रडता येत नाही
संकटे पाहून सुध्दा त्याला पळता येत नाही,
सावकाराचे असते त्यावर कर्जाचे ओझे.
कसे वाहत असेल तो संसाराचे बोझे,
स्वत: उपाशी राहून मुलांना जेवू घालतो
दु:ख सहन करत—करत घरच्यांना पाळतो,
असे त्याच्या जिवनात दु:ख किती येते
पण असे होत नाही की तो त्याला भिते,
जो करतो आपल्या मुलांच्या चुका माफ
त्यालाच तर म्हणतात आपला प्रिय बाप.

कु पुजा हरीदास परंडे
बी.कॉम.भाग— १



Scanned with OKEN Scanner

## ❊ शेतकरी राजा ❊

तू रात्रंदिन करतो भिरभिर काम
तरि तुझ्या जिवाला तिळभर नाही आराम.
गुराढोरांसारखे करतो दिवसभर कबाडकष्ट
त्यातील तिनपैसे उरू देत नाही तुला राजकारणी भ्रष्ट
मुलाच्या शुल्क परिक्षेसाठी तुला जीव गमवावा लागतो
तर दुसरीकडे नोकर दहा करोड घेवून भागतो.
कोपला हा निसर्ग पडत नाही पाऊस
तरी तुला भागवावी लागते आपल्या परिवाराची हाऊस.
शेतकरी राजा व्यर्थ जाणार नाही तुझ्या कष्टाचे मोल
जयजयकार होईल तुझा बाजतील सोन्याचे ढोल
तुझ्या घामामुळे मिळतात जगाला चून अन् भाकरी
भाकर घडवत नाही पांढरपेशा लोकांची नोकरी
मागे राहणार नाही तू जरी झाले तुझ्यावर लाखो वार
शेतकरीराजा शेवटी फक्त आहे तुझाच जयजयकार
तुझाच जयजयकार.

कु पुजा हरीदास परंडे
बी.कॉम.भाग– १

---

## ❊ न मिळणारं प्रेम ❊

आयुष्यरुपी वळणावर कुणी ना कुणी भेटत असतं
तो मौल्यवान क्षण जन्माचा आनंद देत असतं
जीवनात खरं प्रेम क्वचीतच? मिळत असतं
तरीपण न मिळणारं प्रेमच सर्वांना हवं असतं!!
ते सर्व आयुष्याच सुख नसतं
ते एक तात्पूरतं स्वप्न असतं
जागे होताच लुप्त होत असतं
ते मागून कुणाला मिळत नसतं
तरीपण न मिळणार प्रेमच सर्वांना हव असतं!!
अनुभवनाऱ्यांना माहिती असतं.
मनावरच्या जखमेच औषध नसंत
तरीपण त्या जखमेच लालच असतं
कुणी ना कुणी हृदयात वसत असतं
तरीपण न मिळणारं प्रेमच सर्वांना हव असतं!!
भावनेच्या रुळावरचं अपघात असतं
तोल गेला तरी सावरता येत नसतं
त्यावरुन चालायला मन घाबरत असतं
ज्यांनी अनुभवलं त्यांना माहित असतं
तरीपण न मिळणारं प्रेमच सर्वांना हव असतं!!
ते मागून कुणाला मिळत नसतं
नशिबवंतांना ते कळत असतं
आयुष्याचा जोडीदार हेच आपलं खर प्रेम असतं
तरीपण न मिळणारं प्रेमच सर्वांना हव असतं!!

कु वैष्णवी सुभाष डेरे
बी.कॉम.भाग– १

## ✻ वेलंटाईन डे ✻

आज होता सनडे
आठवलं आज १४ फेब्रुवारी वेलंटाईन डे
गेलो फुलवालीकडे
सोबत आणले भजे—वडे
मी म्हणलं गर्लफ्रेंड वाट पाहत असणार गडे
पाहू लागलो चोहीकडे
मी गेलो तिच्या घराकडे
बाप दिसताच डोक्यात वाजले, धोक्याचे घंटे
सोबत मिळाले आईचे चार—पाच डंडे
मला काय माहित त्या मुलीच्या
आईवडीलांचे विचार असतील घाणेरडे
मग काय पून्हा नाही करणार, वेलंटाईन डे....

कु.वैष्णवी सुभाष डेरे
बी.कॉम.भाग—१

---

## ✻ जबरदस्त लगीन ✻

काल आमच्या गावात झालं एक जबरदस्त लगीन
सगळेच जण होते रस्सा पिण्यांत मगन
काय सांगू तुम्हाले लग्नाचा होता भारी थाट
पारावरच आले समोर जिलबीचे ताट
हयगयी नाही केली जिलबी खाण्यांची
फक्त तिथे सोय नव्हती थंड पाणी पिण्यांची
सोबत्यांनी पोटभर खाल्ला ताटातला नरम माल
काय सांगू तुम्हाले दुसऱ्या दिवशी झाले त्यांचे चांगलेच हाल
सगळेच जण होते गुंग जिलेबी खाऊन
बॅंडचा आवाज आला की, आले सगळेच जण धावून
नवऱ्या, मुलाने नेली मोठया थाटात वऱ्हात
लग्नात होता बॅन्ड, बाज्या आणि बारात
नाचणाऱ्यांच्या धुळ्ळयाने घोडा बी मळला
नवरदेव मान बिचारा धपकन् खाली पळला
कसा—बसा गणपत मंडपात गेला
सोबत्याने त्याले मंडपातच गॉगल लावून दिला
शास्त्रीची मंगलाष्टके म्हणून झाली
द्वारा टाकायची बारी आता नवरदेवाची आली **I am Sory**
वधू म्हणून शास्त्रीलेच म्हणे थोडे अलीकडे सरका
तुमचा काही गुन्हा नाही, कारण मीच आहे म्हणे भेरका
सगळेच जण आपापल्या घराकडे वळले, बिचाऱ्या गणपतचे लग्न तेथेच मोळले
सावकाराकडून काढले होते म्हणे त्या कर्ज
पाच—पाच मिनिटाले येऊ लागले गणपतच्या घरी अर्ज
गणपत म्हणे त्या लग्नासाठी केले वेगवेगळे करार
ही गोष्ट झाली म्हणे त्या पिश्चरसारखी लग्नाचा करार बायको फरार

कु.योगीता माणिक पाचे
बी.ए.भाग— ३

## * आधुनिक मुलगी *

काय सांगू बाप्पा आतच्या पोरी! घरोघरी दिसते जिन्स पॅन्ट वाली!!
लंबी–लंबी केसाची पध्दतच गेली! वेणी–फणी गेली आता बाय कट आली!!
हे सगळ पाहून विचारात पडतो मी! मया लग्नालोक मोडल का नाही पध्दत ही!!
आताच्या पोरी म्हणजे गयाला दोरी! माय–बापाची बी.पी.जाते वरीवरी!!
नमस्कार गेला आता हलो हाय आलं! पूर्वीचे संस्कार आता खतमच झालं!!
हे पाहून झाल माया अंगाच पाणी–पाणी! मी तर अशा पोरीले बिल्कुलच करणार नाही मायी राणी!!
आताची पोरगी केमिकल लावू–लावू थकून गेली! तिले वाटे जणू काही आहे मी चिकनी चमेली!!
एखादी अमली सिधी नात्यात! विचार करीन मी ३५ च्या आत!!
भाऊ! आपण बी घेतली जबरदस्त शपथ! नाही करु देणार माया बायकोला स्टेपकट!!

कु योगीता माणिक पाचे
बी.ए.भाग– ३

---

## * आग लागली *

होय मला आज जाग आली
जगण्यांची आज साज आली
माणूस म्हणून विसरलो होतो स्वत:ला
आज वाटते माणूसकी जागली
होय मला आज जाग आली
जगण्यांची आज साज आली
पैसा पैसा करत होतो मी
त्या पैशाला आज आग लागली
होय मला आज जाग आली
जगण्यांची आज साज आली
ना नात्याला पाहीले कधी
ना स्वत:ला त्या पैशा पाई,
केले अनेक घोटाळे
वाठलय आता मी खुप कमवले
पण त्या पैसा पाई मी खुप गमवले
काय केले अस मोदीजी तुम्ही
या डावात मला सर्व काही हरवले
नमो शब्दाची मला आज महीमा कळली
भारतभर भ्रष्टाचार पूर्णत: गळाली
होय मला आज जाग आली
जगण्यांची आज साज आली.

विपूल रंगराव चव्हाण
बी.कॉम.भाग– ३



Scanned with OKEN Scanner

# ※ आई ※

आईची ती प्रेमळ माया
आई शिवाय कुठेही मिळणार नाही
एक जन्म तर काय सात जन्म घेतले, तरी आईचे ऋण फिटणार नाही
तुझ्यावर माझे प्रेम आहे
हे सिध्द करण्यासाठी घराबाहेर पडले
पण मायेच्या ममतेत जास्त प्रेम होत म्हणून माघारी फिरले.
आईची माया अथांग सागरा प्रमाणे असते
ज्याचा शेवट कधीही होत नसते
आईमुळे जिवनाला आकार मिळते, तिच्यामुळे जीवन साकार होते

कु रेशमा संजय म्हातारमारे
बी.ए.भाग- २

# ※ वेद कालीन स्त्री : दर्जा ※

वैदिक कालखंडात स्त्रियांना समाजात फार मानाचे स्थान होते. 'माता' ह्या पदाला आदराचे स्थान होते. स्त्रियांना शिक्षणाचे, राजकिय, सामाजिक व धार्मिक कार्यात पुरुषा प्रमाणे भाग घेण्यांचे स्वातंत्र्य होते.

आर्यांची कुटुंबव्यवस्था जरी पितृप्रधान होती, तरी स्त्रियांचा सामाजिक दर्जा उंच असल्यामुळेच, आर्य–संस्कृती दिर्घकाळ टिकून राहण्यांसम दत झाली.

आर्य संस्कृतीत 'कुटूंब' हा घटक समाजाचा आधारस्तंभ होता. आणि कुटूंबात 'माता' केंद्रस्थानी होती कुटूंबात जन्माला येणारी प्रत्येक मुलगी ही 'वीरप्रसवा' असल्यामुळे वैदिक काळात तिला अत्यंत आदराचे स्थान होते.

१) विवाह

विवाहाच्या बाबतीत स्त्रीला संपूर्ण स्वातंत्र्य असे लग्ने साधारणपणे पंधराव्या सोळाव्या वर्षी होत असत. कुटूंबातील जेष्ठ व्यक्तीच्या संमतीने विवाह ठरविले जात असत तसेच स्वयंवराच्या पध्दतीवरुन स्त्रियांच्या विवाहविषयक संमतीला किती महत्व होते हे सिध्द होते.

वैदिक काळात एक धार्मिक (करार) संस्कार ऐवढेच विवाहाचे स्वरुप मर्यादित नव्हते. तर कुटूंब, संवर्धना करिता, पुत्र प्राप्ती करीता आणि आर्य समाज वृध्दींगत करण्यांसाठी स्त्री, जननी आहे या दृष्टीने तिचे महत्व होते. त्याही काळात हुंडा पध्दतीचे अस्तित्व आठवून येते पण त्याचे स्वरुप मर्यादित होते.

विवाह एक धार्मिक संस्कार असल्यामुळे माणूस विवाहाची बंधने तोडू शकत नव्हता जो पर्यंत पत्नी सामाजिक व धार्मिक बंधने ठेवून आहे. तो पर्यंत पतिला तिचा सांभाळ करावाच लागत होता. कुमारीकेच्या आयुष्यात एकदाच विवाह होत असे. समाजात एकपत्नीत्वाची प्रथा होती बहुपत्नीकत्वावर बंधने होती. अपवादात्मक उदाहरणे घडत होती. सामान्यपणे, स्त्री, मद्यपान करणार, व्याधिग्रस्त, लबाड, वांझ, दव्यनाश करणारी, कर्कशा, मुलीनांच जन्म देणारी, असल्यास, पुरुषांना दुसरे विवाह करण्यांची परवानगी होती. वैदिक काळात पूनर्विवाह, नियोग, विवाह, मान्य होते. (नियोग विवाह म्हणजे, स्त्रिचा पती मरण पावला असेल तर तिला पुत्र नसेल तर अशी स्त्री दिरांशी पुत्रप्राप्ती करिता लग्न करत असे व तो पुत्र पहिल्या पतीचा मानत असत. कन्या ही कुळाला दिलेली असते. केवळ पतीला नव्हे अशी मान्यता होती. . .

२) स्त्री–स्वातंत्र्यावर बंधने :–

वैदिक काळातील स्त्रियांचे स्वातंत्र्य जसे, राजकिय, धार्मिक, सामाजिक नंतरच्या काळात बंधनात गेले. पितृस्तकाळात समाजपध्दतीला अवाजवी महत्व आल्यामुळे मनु म्हणतो की "कुमारी असतांना पिता, योवनकाळात पती, आणि वृध्दापकाळात पुत्र, स्त्रियांचे रक्षण करतात त्या मुळे स्वातंत्र्य उपभोगण्यांस त्या अपात्र आहेत. असे म्हणून स्त्रियांचे अधिकार संपविण्यांचा प्रयत्न झाला.

स्त्रियांना जरी स्वातंत्र्य नाकारले गेले तरी स्त्रियांचे सामाजिक महत्व कमी झाले नाही त्यांना आदराने वागविल्या जात असे.



Scanned with OKEN Scanner

३) पत्नी :—

पत्नी ह्या नात्याने स्त्रीला फार मोठी जबाबदारी पार पाडावी लागत होती ती गृहस्वामीनी, असल्यामुळे कुळाला वैभव तिच्यामुळे प्राप्त होत असे पत्नीच्या योगे पती परत जन्माला येतो म्हणून पत्नीला 'जामा' म्हटले आहे. पत्नी आणि मुले यांच्या मुळे पुरुष पूर्ण बनतो असे आर्य नामित.

४) माता :—

मातेला समाजात आदर्श स्थान होते. माता असणाऱ्या स्त्रीला पूर्ण स्त्री समजत असत. 'मातृदेव भव' माता जरी काही कारणाने पतिंत झाली, तरी पुत्राने तिचा अनादर करु नये पुत्र संबधाने, माता कधीच पतित /अपवित्र होत नाही तिच्या ऋणातून पुत्राला कधीच मुक्त होता येत नाही पुरोहित, गुरु, पिता यांच्या पेक्षा माता श्रेष्ठ होती.

५) शिक्षण :—

वैदिक काळात स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने शिक्षण घेण्यांचा अधिकार होता. 'चरण' नावांच्या वैदिक विधी नंतर स्त्रियांना शिक्षणा करिता प्रवेश मिळत असे तसेच उपनयनविधी झाल्यानंतर पुरुषा प्रमाणे वेदाध्ययनाचा त्यांना अधिकार होता. ज्ञान किंवा शिक्षणाची देवता सुध्दा एक स्त्री—सरस्वती आहे ही बाब विशेष लक्षात घेण्यासारखी आहे.

वैदिक काळात शिक्षण घेणाऱ्या स्त्रियांचे २ प्रकार सांगितले आहेत.

१) संद्योवध्व — विवाह करुन संसार करिता आणि

२) ब्रम्हवादिन्य — ऋषी प्रमाणे अविवाहित राहून वेदाभ्यासात आपले आयुष्य व्यतीत करित

उदा. घोषा, विश्ववारा, लोपामुद्रा ऋग्वेदान या ब्रम्हवादीनी स्त्रियांच्या ऋचा आहेत.

उपनिषद काळातील स्त्रियांनाही शिक्षणाचा अधिकार होता. गुरुकुल माध्यमातून शिक्षण मिळत असे. अत्रैयी, मैत्रयी, गार्गी ह्या विद्वान म्हणून मान्यता होती. तर वेळप्रसंगी युध्दातत भाग घेवून पराक्रमही करित असत.

वेदकाळातील स्त्रिया उत्तम गृहिणी होत्या उष:काला पासून ते रात्रीच्या निद्रे पर्यंत घरातील कुटुंबाची दैनंदिन सर्व कामे त्यांना करावी लागत होती वेळ मिळाल्यास त्या, ज्या कलेत पारंगत असत ते कामही मोठया हौशीने व कुशलतेने त्या करित

६) वेश्याव्यवसाय :—

समाजाची आणि नीतीमत्तेची बंधने न मानणाऱ्या वेश्या, गणिक अथवा नर्तकी प्राचिन भारतात सुध्दा होत्या. हा व्यवसाय करणाऱ्या स्त्रिया सुसंस्कृत सुस्वरुप चौसष्ट कला मध्ये निपून व संपन्न होत्या त्या अविवाहित जिवन व्यतित करत होत्या. व्यवसायातून मिळणाऱ्या संपत्ती मधून त्या दानधर्म व लोकहिताची कामे करत असत. त्यांना समाजात विशिष्ट दर्जा होता.

७) स्त्री व कायदा:—

वैदिक काळात स्त्रीला पित्याच्या संपत्तीत वाटा मिळत असे पुत्र नसलेला पिता आपल्या मुलीलाच पुत्रा प्रमाणे हक्क देत असे तो समाजमान्य होता.

८) सती :—

वैदिक काळात सतीची पध्दत नव्हती परंतू ऋग्वेद व अर्धवेदातील उल्लेखावरुन वेद पूर्व भारतात सतीची पध्दत देशात रुढ होती ती आर्याच्या आगमनानंतर बंद झाली असावी आर्यकाळ किंवा उपनिषद काळापासून सतीकाळ रुढ झाली होती.

पूर्व वैदिक कालखंडात स्त्रिला अतिशय अदराचे स्थान होते. तिचा दर्जा उंच होता. परंतू उत्तर वैदिक काळखंडा पासून स्त्रिच्या अनेक स्वांतैयाकर अनेक प्रकारची बंधने येवू लागली पुरुषप्रधान समाजाचे प्राबल्या वाढले तशी स्त्री दास्य श्रृंखलेत अडकत गेली असे असेल तरीही तिचे पाविंय कायम होते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे महाभारतातील द्रोपदीचे वस्त्र हरण होय.

वरील प्रमाणे वैदिक ते आर्यकाळ पर्यंत स्त्रीयांची सामाजिक स्थिती व दर्जा असल्याचे दिसून येते. परंतू त्या पुढील काळापासून ते मध्ययुगीन काळापर्यंत भारतीय स्त्री म्हणजे, दर्जा उच्च मान खुप पण स्वातंत्र्य नाही अशा अवस्थेत गेली.

प्रा.सी.ए.घुगे
इतिहास विभाग



Scanned with OKEN Scanner

# * उपयोजित मराठीचे महत्व: आजच्या संदर्भात *

मराठीच्या अध्यापनात वाङ्‌मयीन भाषा व साहित्याची भाषा यालाच विशेष महत्व आहे. त्या अनुषंगाने मराठी गद्य वाङ्‌मय, पद्य वाङ्‌मय फार तर कथा, कादंबरी, कविता चरित्र, आत्मचरित्र, ललीत या अंगानेच मराठीचा विचार केला जातो. साहित्याची भाषा ही व्यवहारभाषेच्या साहित्यात फारसा वापर होत नाही त्यामुळे मराठीचा अभ्यास म्हणजे साहित्याचा अभ्यास अशीच समजून विद्यार्थ्यांची झाली आहे. मराठी हा एक अभ्यासक्रमाचा व जीवनोपयोगी नसणारा विषय असे समजून केवळ परीक्षाकेंद्री अभ्यास करण्याची प्रवृत्ती अधिक वाढत आहे. पण प्रत्यक्षात कार्यालयात, पत्रव्यवहार, वृत्त लेखन, जाहीरात लेखन, निवीदा, सभा, संमेलने इत्यादी अनेक गोष्टी विद्यार्थ्यांना शिकता येत नाही. म्हणनच त्यांना अभ्यासक्रमातील मराठी बरोबर उपयोजित मराठीचा परिचय करुन देणे ही आजच्या काळाची गरज वाटते.

आजचा काळ हा माहिती व तंत्रज्ञानाचा काळ आहे. त्यामुळे त्याचा संबंध साहित्याच्या भाषेपेक्षा व्यवहाराच्या भाषेशी अधिक जवळचा आहे. त्यामुळे उपयोजित भाषेच्या संदर्भात मराठीचा विचार होणे अपरिहार्य वाटते साहित्याच्या भाषेसोबत व्यवहाराच्या भाषेची सांगड घालणे विद्यार्थ्यांसाठी निश्चितच उपयुक्त ठरणारे राहील. आपण आनंद मिळविण्यांसाठी ललीत वा:मयाचे वाचन करतो. रसिकांना ललीत वाङ्‌मय प्रेरणादायी ठरते त्यातून आनंदाची निर्मिती होते, पण जीवनोपयोगी ठरते ती म्हणजे उपयोजित भाषा.

आपल्या देशाची प्रांतरचना ही भाषावार प्रांतरचना आहे. महाराष्ट्रात महाविद्यालयीन स्तरावर द्विभाषा सूत्र स्वीकारले आहे. भारतीतील न्यायालयीन व कार्यालयीन व्यवहार आतापर्यंत इंग्रजीतून चालते होते, आता हे व्यवहार मराठीतून चालतात. न्यायालयाने देखिल मराठी भाषा कामकाजात स्वीकारली आहे. मंत्रालयापासून तर स्थानिक कार्यालयापर्यंत आता मराठीचा वापर व्हायला लागला आहे. त्यामुळे वर्तमानपत्रे, न्यायालयाचे, कार्यालये यात आता उपयोजित मराठीला महत्व प्राप्त झाले आहे. शासकिय कार्यालयातून सर्व व्यवहार आता इंग्रजी ऐवजी मराठी भाषेतून व्हायला लागले आहेत त्यामुळे उपयोजित मराठीचा अभ्यास करणे आवश्यक झाले आहे.

आजच्या संदर्भात उपयोजित मराठीचे महत्व सांगतांना पुढील संदर्भ विशेष उलेखनीय वाटतात.

१) संगणकीय क्रांती :—

सद्यास्थित संगणक क्षेत्रात कमालीय क्रांती झालेली आहे. दूरसंचार व इलेक्ट्रॉनिक्सने अक्षरश: धमाल केली आहे. त्यामुळे संदेशवहन व रोजगाराच्या असंख्य संधी उपलब्ध झाल्या आहेत. संगणकात व संदेशवहनात इंग्रजी सोबतच मराठी भाषा देखिल वापरली जात आहे. आता लेखनासाठी टंकलेखन यंत्र कालबाह्य झाले व संगणकाने सुंदर सुवाच्या व आकर्षक अशी कलात्मक लिपी निर्माण केली. संगणकांत गती, अचूकता व सौंदर्य यांचा समन्वय आहे. कार्यालयाचे संगणकीकरण करण्यांची प्रक्रिया सर्वत्र चालू आहे. कार्यालयाचे संगणकीकरण झाले तर कार्यालयीन व्यवहार मराठीत व्हायला लागल्याने उपयोजित मराठी आता विशेष महत्वाची ठरणार आहे.

२) संदेश वहन :—

मानवी व्यवहारात संवादाला अतिशय महत्व आहे. संवादा शिवाय संपर्क नाही व संपर्कासाठी भाषा हेच एकमेव प्रभावी माध्यम होय संदेशवहनातून मानवी भाषा अभिव्यक्त होत असते. संदेश ही विचाराची अभिव्यक्ती असते. केवळ व्यक्तीगत जीवनात व भावनांचे आदान प्रदान करण्यांसाठीच संदेश वहनाचे महत्व नाही तर सामाजिक व व्यवसायीक क्षेत्रातही त्याचे महत्व अनन्य साधारण आहे. संदेशवाहनातून माहिती व विचारांची देवाणघेवाण करता येते व यासाठी उपयोजित भाषेला महत्व आहे. संदेशवहनात उपयोजित मराठीचा वापर व्हायला लागला आहे.

मनवी भावनांचा अविष्कार संदेशवहनाच्या माध्यमातून होत असतो संदेश ही विचाराची अभिव्यक्ती असते. केवळ व्यक्तीगत जीवनात व भावनाचे आदानप्रदान करण्यांसाठीच संदेशवहनाचे महत्व नाही तर सामाजिक व व्यवसायिक क्षेत्रातही त्याचे महत्व अन्यन्य साधारण आहे.

३) कार्यालय व व्यापारी व्यवहार :—

अलीकडे शासकिय व निमशासकिय तसेच व्यापारी कार्यालयात मराठीचा उपयोजित भाषा, म्हणून वापर व्हायला लागला आहे. पत्रव्यवहार ही व्यापाराची व कार्यालयाची महत्वाची संदेशवहन पत्रलेखनात साहित्याची भाषा वापरली जात नाही तर व्यवहारीक लागते कार्यालयात टिपणी, अहवाल, प्रस्ताव, ठराव, इतिवृत्त सर्व उपयोजित भाषेत तयार केले जाते.



Scanned with OKEN Scanner

४) व्यवहारीक व्यवहार :—

व्यक्तीगत आयुष्यातील विविध व्यवहार हाताळण्यासाठी उपयोजित भाषा उपयुक्त असते. दैनंदिन जीवनात तक्रारपत्रे, निवेदने, एवढेच नव्हे तर नोकरीपूर्वी अर्ज करणे, मुलाखत देणे, नियुक्ती नोटशिट्स तयार करणे निरनिराळ्या बँक नोंदी करणे यासाठी उपयोजित भाषा ज्ञात असावी लागते या भाषेशिवाय कार्यालयीन व व्यक्तीगत कामकाज देखील सुकर होणार नाही उपयोजित भाषेमध्ये महाराष्ट्रात मराठीला पर्याय नाही.

५) वृत्तपत्रीय क्षेत्र :—

महाराष्ट्रात मराठी ही मराठी माणसाची सवय झाली आहे. वृत्तपत्रात पत्रकार, संपादक, उपसंपादक होण्यासाठी मराठी भाषेचे विशेष ज्ञान असणे आवश्यक आहे. वृत्तलेखन, जाहीरात लेखन, स्तंभलेखन, शोध पत्राकरिता यासाठी साहित्याची नव्हे तर व्यवहाराची भाषा ज्ञात असली पाहिजे. बातम्या लेखनात वाङ्‌मयीन भाषेपेक्षा उपयोजित भाषाच जवळची मानली जाते. वृत्तपत्रातील बातमी ही सामान्य वाचकाला समजेल अशा स्वरुपाची असावी ही अपेक्षा असते त्यामुळे वृत्तपत्रीय क्षेत्रात कार्य करु इच्छिणाऱ्या युवकांना उपयोजित मराठी भाषेचे ज्ञान असले पाहिजे वर्तमानपत्रात केवळ बातम्याच महत्वाच्या असतात असे नाही, तर वर्तमानपत्रात अग्रलेख, लेखन, विविध सदरे बातम्यांसोबत असतात हया सर्वासाठी उपयोजित मराठीचाच वापर होतो.

६) जाहिरात लेखन :—

जाहिरात लेख नाही आजच्या युगातील महत्वाची कला आहे. या कलेला कुणी पासष्टावी कला असे संबोधतात जनसंपर्कासाठी जाहिराती सारखे दुसरे साधन नाही, भारतात लघुउद्योग संस्था, मोठमोठया उद्योगसंस्थाचे जाळे विणले जाते आहे. आपले कर्मचारी, ग्राहक, संचालक, विरक, विक्रेते इत्यादी अनेक घटकांना माहिती देण्यांसाठी जाहीरातीचा उपयोग होतो. यावरुन जाहीरातीचे महत्व लक्षात येते त्यासाठी जाहीरात लेखन कला, व्यवहारीक भाषेत करण्यांचे कौशल्य संपादन करावे लागेल व तो उपयोजित मराठीचा भाग मानल्या जातो.

आजच्या काळाच्या संदर्भात युवकांना उपयोजी मराठीची अत्यंत आवश्यकता आहे. त्यामुळे तिचे अध्यापन होणे आवश्यक वाटते.

प्रा.डॉ.एस.ए.राठोड
मराठी विभाग

---

## ❊ भारतातील पर्यावरण संरक्षणविषयक कायदेशीर तरतुदी ❊

प्रस्तावना :

'मानवी हक्क' या संकल्पनेचा उदय २०व्या शतकात सुमारे ६ दशलक्ष ज्यू लोकांची निघृण हत्येनंतर झाला. त्यानंतर संयुक्त राष्ट्र संघाने १० डिसेंबर १९४८ रोजी आयोजित केलेल्या अधिवेशनात मानवी हक्कांचा सार्वभौमिक जाहिरनामा प्रविष्ट करुन मानवी हक्कांचे संरक्षण, जतन व संवर्धन करण्याच्या दृष्टीने एक पाउल टाकले.

औद्योगिकीकरण, नागरिकरण, आधुनिकीकरण इत्यादीमुळे मानवी परिसर व मानवी पर्यावरण यांना धोका निर्माण होण्याची भिती मानवाला वाटू लागली. त्यातून कालांतराने पर्यावरण संरक्षण व संवर्धन या संकल्पना पुढे आल्या व त्यातून पर्यावरण सुरक्षा हक्क ही संकल्पना मान्य करण्यात आली. परिसर व पर्यावरण यामध्ये बिघाड होण्यामध्ये प्रामुख्याने औद्योगिक आणि आण्विक क्षेत्रातील वाढता कचरा, वायू व पाणी प्रदुषण यांचे वाढते प्रमाण व प्रचंड प्रमाणात होणारी जंगलतोड पर्यायाने होणारी जंगलक्षेत्रातील घट, अनेक उपयुक्त औषधी व वनस्पतींचा होणारा विनाश, जमीनीची धूप त्याचबरोबर पूर, भूकंप, ज्वालामुखी यातूनच पर्यावरणाचे संतूलन ढासळते. तसेच मानवाकडून होणारी वाघ, हरिण, रानडुकरे, ससे, पक्षी अशा वन्यजीवांची होणारी शिकार यामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडतो. या सर्व बाबी मानवी जीवनाला व मानवी भविष्याला धोका निर्माण करतात. भ्रमणध्वनीचा व संगणकाचा वाढता वापर मानवी आरोग्य धोक्यात आणतात. त्यात नेत्रविकार, कर्णबधीरता, कंबर व पाठदुखी, पोटाचे विकार, कर्करोग इत्यादींचा समावेश होतो. मानवी आरोग्यासाठी पर्यावरण प्रदुषण टाळणे गरजेचे आहे.

भारतातील पर्यावरण संरक्षण विषयक कायदेशीर तरतुदी :

भारतात पर्यावरणीय समस्यांना प्रतिबंध करण्यासाठी काही कायदेशीर तरतुदी करण्यात आल्या आहेत. त्यापूर्वी पर्यावरण प्रदूषण म्हणजे यात अशा धोकादायक पदार्थांचा समावेश होतो, जे मानवाला धोका निर्माण करतात. अन्य सजीवांना, वनस्पतींना सुक्ष्मसेंदीय जीवांना, मालमत्तेला किंवा पर्यावरणाला धोका निर्माण करतात. भारतीय दंड विधान अधिनियमातील भाग २६८ ते २९० या कलमांनुसार सार्वजनिक उपद्रव निर्माण करणाऱ्या वस्तू, ज्या वस्तू कोणत्याही कार्यक्रमाला धोका निर्माण करतात, हानी पोहचवितात, कार्यक्रमात अडथळा आणतात, सार्वजनिक किंवा अन्य कोणत्याही क्षेत्रात पर्यावरणाला धोका निर्माण करणाऱ्या बाबींचा किंवा वस्तूंचा समावेश पर्यावरण प्रदूषणात होतो.

वरिल तरतुदींशिवाय पर्यावरणाचे व पर्यायाने मानवी हक्कांचे संरक्षण करणारे विविध कायदे भारत सरकारने मंजूर केले असून ते पूढीलप्रमाणे आहेत.

• वन्यजीव संरक्षण कायदा, १९७२ :

भारतातील विविध वन्यजीवांचे संरक्षण व्हावे म्हणून भारत सरकारने हा कायदा मंजूर केला. या कायद्यानुसार जंगलातील सर्व वन्यजीवांचे संरक्षण व संवर्धन व्हावे म्हणून वन्यप्राणी व पक्ष्यांच्या शिकारीवर, त्यांच्या व्यापारावर बंदी घालण्याची तरतुद या कायद्यात असून संकटग्रस्त प्राणीजाती व प्रजाती यांच्या संरक्षणासंबंधी तरतुद करण्यात आल्या आहेत.

• जल–प्रदुषण नियंत्रण कायदा, १९७४ :

हा कायदा १९७४ साली मंजूर करण्यात आला. यासाठी मध्यवर्ती व राज्यस्तरीय जल प्रदुषण मंडळांची स्थापना करण्यात आली. या कायद्यांतर्गत जलप्रतिबंधक व जलप्रदुषण नियंत्रणासंबंधी सल्ला दिला जातो.

• वन संवर्धन कायदा, १९८० :

भारतामध्ये वन संवर्धन कायदा १९८० साली मंजूर करण्यात आला. जंगलतोडीवर नियंत्रण, जंगलांचे संरक्ष व संवर्धन या संदर्भात हा कायदा आहे.

• वायू प्रदुषण प्रतिबंधक आणि वायू नियंत्रण कायदा, १९८१ :

भारतात स्वातंत्र्येत्तर कालखंडात औद्योगिकीकरण आणि नागरीकरणाचा वेग वाढल्यामुळे प्रदुषणविषयक समस्या निर्माण झाल्या. त्यामुळे १९८१ साली हवेचे प्रदुषण नियंत्रित करण्यासाठी व हवेची गुणवत्ता राखण्यासाठी हा कायदा सरकारने मंजूर केला.

• पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ :

पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन व्हावे या उदेशाने सरकारने हा कायदा निर्माण केला असून त्यामध्ये ज्या व्यक्ती पर्यावरण प्रदुषण करुन पर्यावरणाला धोका निर्माण करतील त्यांना ७ वर्षे तुरुंगवासाची शिक्षा व १ लाख रुपये दंड भरावा लागेल, अशी तरतुद केली आहे.

निष्कर्ष :

केंद्र सरकारने आणि राज्य सरकारांनी वेळोवेळी पर्यावरणाचे संरक्षण व्हावे या हेतूने जवळपास २०० कायदे तयार केले आहेत. परंतू त्यांच्या अंमलबजावणीत ढिसाळपणा असल्याने पर्यावरणाचे संरक्षण करण्यात सरकारला म्हणावे तितके यश मिळाल्याचे दिसत नाही. चोरटया पध्दतीने वाघ, मोर, इतर पक्षी, वन्यजीवांची शिकार होतांना दिसते. वन्य प्राण्यांना संरक्षण देण्यात सरकारला येणाऱ्या अपयशाचे हे प्रतिक आहे.

सन २००४ साली भारतातील नदी प्रदुषणाचा अभ्यास करणाऱ्या संशोधकांच्या पथकाने जो अहवाल प्रकाशित केला, त्यामध्ये असे म्हटले गेले आहे की, भारतातील गंगा, यमूना, नर्मदा, गोदावरी, ब्रम्हापूत्रा याचबरोबर सुमारे ७२ नद्या, तर महाराष्ट्रातील १६ नद्या प्रदुषणाने गुदमरल्या आहेत. या सगळयांचा मतीतार्थ असा की, पर्यावरण संरक्षाचे हक्क व मानवाचा जीवन जगण्याचा हक्क हे परस्परांवर अवलंबून आहेत. या दोन्ही हक्कांचे रक्षण होणे आवश्यक आहे.

संदर्भ :


१. कुलकर्णी पी.के, मानवी हक्क आणि सामाजिक न्याय, डायमंड पब्लिकेशन, पुणे
२. भुसारी निळकंठ, मानवी अधिकार–विस्थापनाच्या व पर्यावरणाच्या समस्या.
३. शिरुरकर देवेंद्र, मानवी हक्क म्हणजे काय?, मुक्तरंग प्रकाशन, लातूर



प्रा.पी.आर.तायडे
राज्यशास्त्र विभाग




Scanned with OKEN Scanner

## ✻ शारीरिक शिक्षण विभाग ✻

शारीरिक शिक्षण विभाग महाविद्यालयाचा आत्मा आहे. श्री वसंतराव नाईक कला व श्री अमरसिंग नाईक वाणिज्य महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण विभाग हा विद्यार्थ्यांमध्ये खेळ संस्कृती रुजविण्यास आणि वृध्दिंगत करण्यास सतत प्रयत्नशील आहे खेळाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक तंदुरुस्ती आणि शक्ती उपासना ही जीवनमुल्ये रुजविण्याचा ध्यास या महाविद्यालयाच्या प्रांगणात नेहमी होताना दिसून येतो.

या महाविद्यालयाची पायाभरणी संस्थेचे सचिव मा. श्री आ. अ. राठोड साहेब यांच्या अथक परिश्रमातून झालेली आहे. साहेबांचा प्रयत्न हा नेहमी विद्यार्थी केन्द्रीत आणि विद्यार्थ्यांना लाभान्वित असणारा आहे. त्यांच्या पुढाकाराने महाविद्यालयाला सहा एकराचे विस्तीर्ण प्रांगण प्राप्त झाले आहे. या महाविद्यालयाच्या विस्तीर्ण प्रांगणात शारीरिक शिक्षण विभागाद्वारे खो--खो खेळाकरिता दोन ग्राउंड, व्हॉलीबॉल करीता एक ग्राउंड, कबडी, लॉग जम्प स्वतंत्रपणे ग्राउंड उपलब्ध आहे? या खेळांचे नियमीतपणे सराव महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण विभागाद्वारे महाविद्यालयाच्या प्रांगणात घेतले जातात.

या प्रयत्नातून महाविद्यालयातील श्री अंकुश बापूराव पांडे या विद्यार्थ्याने क्रॉस कंट्री या खेळामधून महाविद्यालयाला कलर कोट हा सन्मान सन २०१० या वर्षी मिळवून दिला आहे. तसेच विद्यापीठाकडून २०१३ मध्ये अश्वमेघ खो--खो स्पर्धेमध्ये महाविद्यालयाची विद्यार्थीनी कु. नंदिनी गजानन शिंदे या विद्यार्थीनीने प्रतिनिधीत्व केले आहे.

विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबत शारीरिक सक्षमतेकडे सकारात्मक पहावे याकरिता दरवर्षी विद्यार्थ्यांसाठी शारीरिक तपासणी करण्यात येते. तसेच खेळाकरिता विद्यापीठ व महाविद्यालयाच्या वतीने प्रोत्साहनपर गुण देण्यात येतात. यामुळे मुलांना चांगला फायदा होत आहे. तसेच पोलीस भरतीकरिता मार्गदर्शन करण्यात येत असून दरवर्षी मुलांची पोलीसमध्ये निवड होत आहे. यासोबतच महाविद्यालयीन परिसरामध्ये शिस्तीचे पालन करण्यात येत असून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात येते.

प्रा. एस.जी.ढाकुलकर
संचालक : शारीरिक शिक्षण विभाग

---

## बिटकॉईन मध्ये गुंतवणूकीच्या संधी व संभाव्य धोके


प्रस्तावना :

सर्वप्रथम सन २००८ मध्ये सातोशी नाकामोटो नावाच्या अज्ञात जपानी व्यक्तीने Bitcoin : A Peer-to-Peer Electronic Cash System या संशोधन लेखात कोणत्याही मध्यस्थ किंवा शासनाच्या नियंत्रणाशिवाय वापरता येणाऱ्या ऑनलाईन चलनाचा उल्लेख केला. त्यानंतर ३ जानेवारी २००९ मध्ये बिटकॉईन या व्यवसायाची सुरुवात केली. बिटकॉईन हे विकेंद्रीत क्रिप्टोग्राफीक स्वरुपाचे ऑनलाईन चलन आहे. यामध्ये बिटकॉईन मिळविण्याकरिता www.bitcoin.com किंवा www.bitcoin.org सर वेबसाईटवर नोंदणी करुन आपले सामान्य चलन बिटकॉईनमध्ये रुपांतरीत करुन घेता येते. मोबाईलमध्ये Bitcoin Wallet, Zebpay, Coinbase यासारखे ॲप्लीकेशन डाउनलोड करुन बिटकॉईनचा देवाणघेवाणीकरिता वापर करता येतो.

बिटकॉईनवर कोणत्याही शासनाचे किंवा संस्थेचे नियंत्रण नसल्यामुळे कोणताही व्यक्ती बिटकॉईन मिळवू शकतो. बिटकॉईनचा वापर आंतरराष्ट्रीय चलन म्हणून करण्यात येत आहे. कारण हे चलन बऱ्याच देशांमध्ये मुळ चलनास पर्याय म्हणून वापरल्या जात आहे. असे असले तरीही याला अधिकृत चलन म्हणून मान्यता मिळालेली नाही. भारतामध्ये देखील भारतीय रिझर्व्ह बँकेने बिटकॉईनला अधिकृत मान्यता नाकारली असून गुंतवणूकदारांना वारंवार सल्ला दिलेला आहे की, आपण यामध्ये पैसे गुंतवू नयेत. त्यामध्ये आपले पैसे बुडाले तर कुठेही दाद मागता येत नाही. या उपरांतही देश विदेशातील लोक बिटकॉईनमध्ये गुंतवणूक करण्यात मोठे स्वारस्य दाखवित आहेत. याला अनुसार पूढील आलेखात दर्शविल्याप्रमाणे बिटकॉईनची किंमत झपाटयाने वाढत आहे.

# DIZZY HEIGHTS

Bitcoin has risen 1600% in the past one year, attracting many new investors in the process.




Graphic by Subrata Jana/Mint

Source: Bloomberg

**बिटकॉईनचे फायदे :**

१. आंतरराष्ट्रीय देवाण–घेवाणी कोणत्याही मध्यस्थाशिवाय पूर्ण होते.
२. गुंतवणूकीवर प्रचंड प्रमाणात परतावा, उत्पन्न मिळते. सन २०१६ मध्ये १ बिटकॉईनची किंमत रु ४५ हजार होती, ती किंमत आज रु. १० लाखांपेक्षा अधिक आहे.
३. बिटकॉईनचे व्यवहार सांभाळण्याकरिता 'बिटकॉईन मायनर' या तज्ञ व्यक्तींची नेमणूक असते.
४. हे व्यवहार सुरळीतपणे व्हावेत याकरिता बिटकॉईन मायनर म्हणून काम केल्यास, कोणतीही गुंतवणूक न करता चांगले उत्पन्न मिळते.
५. जपान या देशाने बिटकॉईन व्यवहारांना अधिकृत मान्यता दिली आहे.

**बिटकॉईनचे संभाव्य धोके :**

१. बिटकॉईन हे निरर्थक चलन आहे, त्याला सोने किंवा नोटांसारखे भौतिक अस्तित्व नाही.
२. बिटकॉईनला भारतामध्ये चलन म्हणून मान्यता नाही, त्यावर केव्हाही बंदी येऊ शकते.
३. चीन, बांग्लादेश, इंडोनेशिया आदी देशांनी बिटकॉईनच्या वापरावर बंदी घातली आहे.
४. बिटकॉईनवर कोणत्याही देशाच्या केंद्रीय बँकेचे किंवा सरकारचे नियंत्रण नसल्यामुळे त्यामध्ये काही घोटाळा झाल्यास गुंतवणूकदारांचे पैसे बुडू शकतात. असे काही घोटाळे झाले आहेत.
५. काही पैसे गुंतवून पैसा कमाविणे याकरिता बिटकॉईनचा वापर सटटा किंवा जुगार म्हणून केला जात आहे
६. बिटकॉईनचा वापर मोठया प्रमाणात लोक आपला काळा पैसा लपविण्याकरिता करत आहेत.
७. बिटकॉईनची झपाटयाने वाढलेली किंमत अचानक कमी झाल्यास गुंतवणूकदारांना मोठा फटका बसू शकतो.
८. बिटकॉईनचा सर्वाधिक वापर अवैध कामांसाठी उदा. हवाला, ड्रग्स तस्करी, शस्त्रे तस्करी याकरिता होत आहे.

या सर्व फायद्या–तोटयांचा विचार करता तसेच बिटकॉईनची अस्थिर असणारी किंमत लक्षात घेवून भारतीय नागरिकांनी रिझर्व्ह बँक व सरकारच्या सल्ल्यानुसार बिटकॉईनमध्ये पैसे न गुंतविणे योग्य राहील. तसेच शासनाने देखील बिटकॉईन गुंतवणूकीवर आणि वापरावर त्वरित बंदी आणली पाहिजे. ज्या लोकांनी बिटकॉईनमध्ये पैसे गुंतविलेले असतील, त्यांची देखील आयकर विभागामार्फत चौकशी केली जावी जेणेकरुन काळा पैसा उघडकीस येईल.

डॉ.लक्ष्मीकांत शिवदास हुरणे
सहा.प्राध्यापक

# ※ अर्थशास्त्र विभाग ※

सन १९७० च्या दशकात तत्कालीन अकोला जिल्हा व सध्याच्या वाशिम जिल्हयातील मंगरूळपीर तालुक्यात उच्च शिक्षणाची सोय नसल्यामुळे या गावातील व परिसरातील मुलांना उच्च शिक्षणासाठी अमरावती सारख्या शहरात शिकावे लागत असे. परंतु गोर--गरीबांच्या मुलामुलींना हे शक्य नव्हते. तेव्हा या भागातील गरीबांची मुले घरच्या भाकरीवर शिकली पाहिजेत या हेतूने दानशुर श्री अमरसिंगजी नाईक यांच्या दातृत्वाने व मा. आ. अ. राठोड साहेब यांच्या अथक परिश्रमातून मंगरूळपीर येथे अमर शिक्षण प्रसारक संथेची स्थापना करुन सन १९७१ मध्ये श्री वसंतराव नाईक कला व श्री अमरसिंग नाईक वाणिज्य महाविद्यालय उभे केले. या महाविद्यालयाच्या स्थापनेमुळे मंगरूळपीर तालुक्याचा व परिसराचा शिक्षण क्षेत्राच्या बाबतीत कायापालट झाला. आतापर्यंत कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयात कला व वाणिज्य शाखेतून हजारो विद्यार्थ्यांनी शिक्षण घेतले असून त्यातील शेकडो विद्यार्थी वेगवेगळया व मोठमोठया पदांवर पोहोचले आहेत. या महाविद्यालयात कला शाखेचे इंग्रजी, मराठी, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र व इतिहास असे पाच विभाग असून प्रत्येक विभाग वैशिष्टयपूर्ण आहे.

या विभागांपैकी एक म्हणजे अर्थशास्त्र विभाग. या विभागा अंतर्गत बी.ए.भाग १ या वर्गास सुक्ष्म अर्थशास्त्र, बी.ए.भाग २ या वर्गाला स्थूल अर्थशास्त्र तसेच बी.ए.भाग ३ या वर्गाला भारतीय अर्थव्यवस्था हा विषय शिकविण्यात येत असून तिन्ही वर्गांचा संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने ठरवून दिलेला संपूर्ण अभ्यासक्रम शिकविला जातो. त्याचबरोबर सोमवार ते शुक्रवार या पाच दिवसांत शिकवून पूर्ण झालेल्या भागावर शनिवारी १० गुणांची चाचणी परीक्षा घेवून त्या उत्तरपत्रिका रविवारी तपासून सोमवारी विद्यार्थ्यांना त्यांची प्रगती सांगितली जाते. या माध्यमातून प्रत्येक वर्गातून प्रगत व अप्रगत विद्यार्थ्यांची यादी तयार करुन अप्रगत विद्यार्थ्यांकरिता विशेष शिकवणीद्वारे प्रगत विद्यार्थ्यांच्या पातळीवर आणले जाते. याचा सकारात्मक परिणाम अलीकडील काळातील विद्यापीठ परीक्षेच्या निकालावर दिसून येत आहे.

तसेच महाविद्यालयाचे पूर्व प्राचार्य संस्थापक सचिव मा.आ.अ.राठोड साहेब यांची अर्थशास्त्र विभागाच्या प्रगतीकरिता सतत मासिक आढावा सभा, वेळोवेळी मार्गदर्शन व सल्ला घेवून या विभागास प्रगतीपथावर नेण्याचे कार्य सुरु आहे.

प्रा. एन.बी.मठपती
अर्थशास्त्र विभागप्रमुख



Scanned with OKEN Scanner

# ❋ वाणिज्य विभाग ❋

श्री वसंतराव नाईक कला व श्री अमरसिंग नाईक वाणिज्य महाविद्यालय, मंगरुळपीर जि. वाशिम हे महाविद्यालय ग्रामीण भागातील शिक्षणाची गंगोत्री आहे. तळागाळातील, गरीबांच्या मुला–मुलींना उच्च शिक्षणाची सोय आपल्याच परिसरात व्हावी हा उदात्त हेतू समोर ठेवून ज्ञानगंगेला आणण्याचे भगीरथ कार्य अमर शिक्षण प्रसारक संस्था, मंगरुळपीर चे संस्थापक सचिव मा.आ.अ. राठोड साहेब यांनी १९७१ साली पूर्ण केले. सन १९७१ मध्ये लावलेले शिक्षणाचे रोपटं आज वटवृक्षामध्ये रुपांतरीत झाले आहे.

महाविद्यालयामध्ये दोन विद्याशाखा आहेत. क्रमशः कला व वाणिज्य विभाग यांना १९७१ पासून अनुदान प्राप्त आहे. वाणिज्य विभाग १९७१ पासून दर्जेदार शिक्षणाचे कार्य करीत आहे. वाणिज्य विभागाद्वारे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण व व्यक्तीमत्व विकासासाठी अथक प्रयत्न करण्यात येतात. महाविद्यालय आणि वाणिज्य विभागाचे वैशिष्टय म्हणजे दर आठवडयाच्या शनिवार या दिवशी शिकवून पूर्ण झालेल्या भागावर सराव चाचणी परीक्षा घेण्यात येतात. यामुळे विद्यार्थ्यांना अभ्यास करण्याची आवड निर्माण होवून त्यांच्या गुणवत्तेमध्ये वाढ होत आहे. महाविद्यालयामध्ये वेळापत्रकाप्रमाणे नियीमत तासिका होतात. जे अप्रगत विद्यार्थी आहेत त्यांचे विशेष वर्ग घेवून त्यांच्या शैक्षणिक अडचणी दुर करण्यात येतात.

वाणिज्य विभागातील विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा विकास करण्यासाठी अनेक उपक्रम राबविले जातात. विद्यार्थ्यांना रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन आणि स्पर्धापरीक्षेमध्ये यश संपादन करण्यांसाठी मार्गदर्शन करण्यात येते. नामवंत व्यक्तींना विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी आमंत्रित करण्यात येते. सोबतच दरवर्षी प्रत्येक शैक्षणिक सत्रामध्ये बी.कॉम. भाग ३ च्या विद्यार्थ्यांसाठी औद्योगिक क्षेत्रभेटीचे आयोजन करण्यात येते. यामुळे विद्यार्थ्यांना औद्योगिक क्षेत्रातील कामकाज, व्यवस्थापन कार्यांची माहिती प्राप्त होते. पर्यायाने विद्यार्थ्यांना औद्योगिक क्षेत्रामध्ये कार्य करण्याविषयी आकर्षण निर्माण होते.

वाणिज्य शाखेकरिता सुसज्ज असे संगणक कक्ष आहे. महाविद्यालयाच्या ग्रंथालयामध्ये वाणिज्य विद्याशाखेच्या संदर्भग्रंथांचा मोठा साठा आहे. याचा विद्यार्थी नियमीतपणे उपयोग घेत असतात.

महाविद्यालयातील वाणिज्य शाखेला भूषणावह बाब म्हणजे शैक्षणिक सत्र २०१५–१६ मध्ये झालेल्या संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या उन्हाळी २०१६ परीक्षांमध्ये श्री ललित तारासिंग राठोड हा विद्यार्थी वाणिज्य शाखेत विद्यापीठात सातव्या क्रमांकाने उत्तीर्ण झाला. यामुळे महाविद्यालयातील शैक्षणिक वातावरण किती विद्यार्थी केंद्रीत आहे हे अधोरेखित होते.

वर्तमानात वाणिज्य शाखेत प्रा. अरुण गजभिये, डॉ. लक्ष्मीकांत हुरणे आणि प्रा. विश्वनाथ हिस्सल हे अध्यापक कार्यरत आहेत.

महाविद्यालयातील वाणिज्य विभागाचे अंतिम ध्येय हे वाणिज्य शाखेतील विद्यार्थी, दर्जेदार, गुणवत्ताधारक आणि रोजगारक्षम तयार करणे हे आहे, किंबहूना वाणिज्य शाखेचे ते ब्रिंद होय.

प्रा. अरुण एन. गजभिये
वाणिज्य विभाग प्रमुख



Scanned with OKEN Scanner





अमर शिक्षण प्रसारक संस्था, मंगरुळपीर, जि.वाशिम.
द्वारा संचालित
श्री.वसंतराव नाईक कला व श्री.अमरसिंग नाईक वाणिज्य महाविद्यालय, मंगरुळपीर, जि.वाशिम.

Takwale-9422939936 / 37

Scanned with OKEN Scanner